Exh. 6/D

रे. क. नं. 59/2026

## मे. दिवाणी न्यायाधिशासो क. स्तर पेठवडगांव यांचे कोर्टात...

श्री. मोहन विलास पाटील ------ वादी

वि रू ध्द

श्री. विलास निवृत्ती पाटील, वगैरे ------ प्रतिवादी

Order
Seen

Sd/-
Jt. CJJD

## ॲ फि डे व्ही ट

मी यातील वादी श्री. मोहन विलास पाटील, व.व. 54, धंदा – शेती, रा. टोप, ता. हातकणंगले, जि. कोल्हापूर सत्यप्रतिज्ञेवर कथन करतो की,

1. मौजे टोप, ता. हातकणंगले, जि. कोल्हापूर येथील गट नं. 1133/ब ही शेतजमिन यातील वादी व प्रतिवादी यांची वडीलोपार्जीत शेती आहे. यातील प्रतिवादी नं. 1 हे वादीचे वडील असून प्रतिवादी नं. 2 व 3 हे वादीचे सख्खे भाऊ आहेत.

2. गट नं. 1133/ब ही शेतजमिन " नाळवा " या नावाने ओळखली जाते. या शेतजमिनीमध्ये आमचे कुटूंबाची हे. 0.20.65 आर शेतजमिन होती. सदर जमिनीचे इतरही सहहिस्सेदारांचे बरोबर याच शेतजमिनीचे वाटप 1975 चे दरम्यान पूर्ण झालेले आहे. त्यानुसार दावा मिळकतीमध्ये एकूण 7 ठिकाणी वाटप करून तुकडे आमचे कुटूंबाचे कब्जात प्रत्यक्ष मालकी हक्काने आलेले आहेत. त्यापैकी एका तुकडयामध्ये

16/3/26
Assistant Superintendant
Civil Court, Peth Vadgaon

आमचे राहते घर आहे. त्यामध्ये आम्ही सर्वजण स्वतंत्र राहत आहोत. दुस–या तुकडयामध्ये आमचे दुसरे आर.सी.सी. घर आहे.

3. त्यापैकी 4 तुकडे पिकावू स्वरूपात आहेत. या व्यतिरिक्त तिसरा तुकडा यातील प्रतिवादी नं. 1 यांनी प्रतिवादी नं. 3 यांना तथाकथीत बक्षीसपत्राने बक्षीस दिल्याचे नुकतेच समजून आलेले आहे. परंतु सदरचा तुकडा फक्त साडेचार गुंठयाचा तुकडा आहे. त्यापैकीही प्रतिवादी नं. 3 याचे वाटपाचा 1 गुंठा जमिन त्याचे संमतीने त्याचे व्यवसायासाठी प्रतिवादी नं. 1 यांनी भिकाजी गोविंद बोते यांना विक्री केलेली आहे. वास्तविक सदर तिस–या तुकडयामध्ये वादीचा दिड गुंठा प्रतिवादी नं. 2 चा दिड गुंठा आणि प्रतिवादी नं. 3 चा फक्त अर्धा गुंठा शिल्लक आहे. असे असताना प्रतिवादी नं. 3 हा अंदाजे 2 गुंठयाचे बांधकाम सदरचे तिस–या तुकडयामध्ये करत आहे. सदरचे बांधकाम आजरोजी फौडेशन लेव्हला आले असून त्यामध्ये 15 आर.सी.सी.कॉलम उभे केलेले आहेत. अशा परिस्थितीत प्रस्तुत प्रतिवादी नं. 3 हा स्वतः बांधकाम व्यावसाईक असलेने व तो कोणालाही जुमानत नसलेने त्यांने सदरचे बांधकाम आजही सुरु ठेवलेले आहे.

4. प्रतिवादी नं. 3 हा वादीला व गावातील पंचाना जुमानत नाही. त्याने बांधकाम केलेस वादीचे कशानेही न भरून येणारे असे नुकसान होणार आहे. त्यामुळे प्रस्तुत प्रतिवादी नं. 3 याने करत असलेले बांधकाम थांबविणेचा मनाई आदेश मिळालेस प्रतिवादी नं. 3 याचे कांहीही नुकसान होणार नाही. याउलट मनाई आदेश न मिळालेस वादीचे कशानेही न भरून येणारे असे नुकसान होणार आहे.

Yn 16/3/16
Assistant Superintendent
Civil Court, Peth Vadgaon.

येणेप्रमाणे संपूर्ण वस्तुस्थिती खरी व बरोबर आहे म्हणून केले ॲफिडेव्हीट असे.

वडगांव :
दि. 16/3/2026

MVPATIL
(ॲफिडेव्हीट करणार)

मी ॲफिडेव्हीट करणार यास ओळखतो

ॲड. आय. के. शिंदे

## प्र ति ज्ञा

मी यातील वादी श्री. मोहन विलास पाटील, व.व. 54, धंदा – शेती, रा. टोप, ता. हातकणंगले, जि. कोल्हापूर सत्य प्रतिज्ञा करतो की, वरील ॲफिडेव्हीट मधील संपूर्ण मजकूर माझे माहिती व समजुतीप्रमाणे खरा व बरोबर आहे म्हणून केली सत्य प्रतिज्ञा असे.

वडगांव :
दि. 16/3/2026

MVPATIL
(प्रतिज्ञा करणार)

Solemnly Affirmed before me by
Shri. Mohan Vilas Patil
Age 54 of Toap Tal Hathanangale who is
identified by Shri I. K. Shinde Adv.
whom I know personally
Dated :- 16/3/26

Assistant Superintendent